जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
आरोग्य विभाग
औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 (दुरध्वनी क्र. ०२४०-२३५०७४४)
जि.प. इ-मेल : zpcsn@rediffmail.com

कार्यालय -इ मेल : dhoauranagabad@rediffmail.com	जाक्र/जिपछसं/आरोग्य/माझंगाव आ.सं.गांव/2433 /२०२६ दिनांक २७/११/२०२६

जाहिर निविदा सूचना

"माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" अभियानांतर्गत कार्यान्वयन सहयोगी संस्था (NGO) म्हणून काम करू इच्छिणाऱ्या संस्थांकडून विहित नमुन्यात अर्ज करण्यासाठी आवेदन. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांचेकडून स्वयंसेवी संस्था (NGO) यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

याबाबततील निवड व मूल्यांकनाचे निकष व अर्जाचा नमुना
https://chhatrapatisambhajinagarzp.maharashtra.gov.in
या संकेतस्थळावर **"सुचना - निविदा"** या सदरामध्ये उपलब्ध आहे.

अर्जदारांनी आपले अर्ज **दिनांक ०७ डिसेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत** जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयात सर्व माहितीनिशी प्रस्ताव सादर करावा. प्राप्त अर्जांमधून निकषात बसणारे व मूल्यांकनानुसार जास्त गुण प्राप्त संस्थांना या कार्यालयात मुलाखत व सादरीकरणासाठी बोलावण्यात येईल.

कार्यालयाचा पत्ता : **जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालय**
आरोग्य संकुल, दुसरा मजला, महाविर चौक, बाबा पेट्रोलपंप समोर
छत्रपती संभाजीनगर - ४३१००१

(डॉ अभय बी.धानोरकर)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर

जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर
आरोग्य विभाग
औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 (दुरध्वनी क्र. ०२४०-२३५०७४४)
जि.प. इ-मेल : zpcsn@rediffmail.com

कार्यालय -इ मेल : dhoauranagabad@rediffmail.com

जाक्र/जिपछसं/आरोग्य/माझंगाव आ.सं.गांव/2434 /२०२६
दिनांक २७/११/२०२६

जाहिर नोटीस

विषय : **दरपत्रक सादर करणे बाबत.**

संदर्भ :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक: आगायो-2025/प्र.क्र.24/ ई ऑफिस क्र. 1245974 /प्रा.आ.से./मंत्रालय/मुंबई, दिनांक : 18 फेब्रुवारी, 2026.

२. मा. आयुक्त (शहरी आरोग्य) आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र जा. क्र.: आयुक्त/आसे/मागाआसंगा अभियान/जिल्हास्तर NGO-EOI/1425-1504/2026. दिनांक : 22 सप्टेंबर 2026.

४. मा.आयुक्त, शहरी आरोग्य सेवा तथा, अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, महाराष्ट्र मुंबई यांचे पत्र क्र.आयुक्त/आसे/मागाआसंगा अभियान/(NGO) निवडीबाबत/१६११-१६९६/ २०२६ दि.०५/११/२०२६

३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.छत्रपती संभाजीनगर संचिका मान्यता दि. २३/११/२०२६

उपरोक्त विषयी जाहिर करण्यात येते की, **"माझ गाव आरोग्य संपन्न गाव"** उपक्रमांतर्गत जिल्हास्तरावर स्वयंसेवी संस्था मार्फत "माझ गाव आरोग्य संपन्न गाव" या उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्या साठी कलापथक (Street Play) या करिता खालील प्रमाणे दर दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अ.क्र	तपशिल	दर विवरण	दर (सर्व करासहीत)
1	जिल्ह्यातील 9 तालुक्यांमध्ये प्रत्येत तालुका 5 कार्यक्रम (दर महा) या प्रमाणे अंमलबजावणी करणे. (एकुण 5 कलाकार प्रत्येक सादरीकरणासाठी व आवश्यक साधन सामग्री सह)	1 संच प्रमाणे प्रत्येक सादरीकरणासाठी	

तरी इच्छुक पुरवठादारांनी वरील साहित्याचे दरपत्रक जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर या नावे राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, आरोग्य विभाग,जि.प.छत्रपती संभाजीनगर,तळ मजला, महाविर चौक-बाबा पेट्रोल पंप समोर, छत्रपती संभाजीनगर -४३१००१ या कार्यालयास दिनांक २७/११/२०२६ ते दि.०७/१२/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. ठराविक वेळेत आलेल्या दरपत्रक दि.१०/१२/२०२६ रोजी सकाळी १२.०० वा कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील. काही अपरिहार्य कारणास्तव दरपत्रक उघडण्याचे अधिकार, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवलेला आहे.

दि.०७/१२/२०२६ रोजी ०५.०० वाजे पर्यंत दरपत्रक बंद लिफाफा पध्दतीने या कार्यालयात सादर करण्यात यावे.

पुरवठादारास खालील अटी व शर्ती लागु राहतील.

1) प्रती पथनाटय (Per session) रु.5,000/- च्या मर्यादेमध्ये दर असावेत.
2) दर हे साहित्याची किंमत व लागू असलेले सर्व कर (जीएसटी) या सह दर्शवण्यात यावे.

3) वरिल सादरीकरण करण्याबाबतचे काम राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी अंतीम केलेल्या यादीप्रमाणे होईल याची दक्षता घ्यावी. तथापी जाहिरातीसंबंधीच्या आदेशाच्या अनुषंगाने होणारे फेरबदल करणे आपणास बंधनकारक राहील.

4) कलापथका द्वारे सादरी करण करताना गर्दीच्या ठिकाणी अथवा बाजाराच्या दिवसी सादरी करण करण्यात यावे.

5) गावामध्ये चौकात कमित कमी अंदाजे 50 लोकापेक्ष्या जास्त गर्दी असलेले ठिकाण निवडावे.

6) दरपत्रक मधील मंजूर दर व्यतिरिक्त कोनताही अतिरिक्त खर्च दिला जानार नाही. (उदा. वाहतुक, हमाली ई)

7) देयके सादर करताना सादरी करण केलेल्या ठिकाणचे फोटो (Jio Tag) व्हिडीओ जोडुन THO/MO यांच्या स्वाक्षरीने सादर करावी.

8) अग्रिम दिले जाणार नाही, काम प्रत्यक्ष पूर्ण झाल्यानंतरच देयके सादर करणेअनिवार्य असुन देयक हे राज्यस्तरावरुन निधी उपलब्धतेच्या अधिन राहून अनुज्ञेय राहील. (देयके -टॅक्स ईनव्हाईस द्वारे सादर करावी)

9) संस्था नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जोडावी.

10) आयकर विभागाकडील पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडावी.

11) वस्तू व सेवा (GST) नोंदणी प्रमाण पत्र.

जिल्हास्तरीय NGO / संस्था निवड निकष

1) लोकसहभागावर आधारित कार्यपद्धतीचा किमान 5 वर्षांचा अनुभव असावा.

2) केंद्र/राज्य शासन, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा युनिसेफ सोबत आरोग्य, स्वच्छता, WASH किंवा संबंधित सामाजिक क्षेत्रात किमान 5 वर्षांचा कामाचा अनुभव असावा.

3) ग्रामीण भागात समुदाय संघटन, जनजागृती, Triggering, Behaviour Change Communication (BCC) यामध्ये प्रत्यक्ष क्षेत्रीय कामाचा अनुभव असावा.

4) ग्रामपंचायत, ग्राम आरोग्य/स्वच्छता समिती, आशा, अंगणवाडी, आरोग्य कर्मचारी आणि स्थानिक नागरिक यांच्यासोबत समन्वयाने काम करण्याची क्षमता असावी.

5) NGO कडे प्रशिक्षित व अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध असावे आणि जिल्ह्यातील विविध तालुके/गावे येथे क्षेत्रीय काम करण्याची क्षमता असावी.

6) संस्थेने केलेल्या कामाचे Work Order/Agreement/MoU / Completion Certificate /अनुभव प्रमाणपत्र / अहवाल / छायाचित्रे यापैकी योग्य दस्तऐवजी पुरावे सादर करावेत.

7) आरोग्य, स्वच्छता, सुरक्षित पाणी, पोषण, प्रतिबंधात्मक आरोग्य आणि सामाजिक वर्तन परिवर्तन या विषयांमध्ये अनुभव असणे अपेक्षित असावे.

8) संस्थेची कायदेशीर नोंदणी वैध असावी आणि संबंधित शासकीय निविदा/निवड प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असावीत.

9) माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानाच्या उद्दिष्टांशी सुसंगत कार्यपद्धती, विशेषतः "Self-realization to Community Action" म्हणजेच स्व-जाणीवेतून सामुदायिक कृतीकडे समुदायाला नेण्याची क्षमता असावी.

10) जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरावरील आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच संबंधित क्षेत्रीय कर्मचाऱ्यांची क्षमता बांधणी (Capacity Building), कौशल्य विकास (Skill Development), प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्याचा अनुभव व पात्रता संस्थेकडे असावी.

(डॉ अभय बी.धानोरकर)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर